# कृषि विभाग

## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०१८-१९

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानअंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय कृषी विकास योजना राज्यात सन २०१८-१९ मध्ये राबविण्यात येत असून, त्यामध्ये खालील नमूद केलेल्या घटकांकरिता लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | घटक | अधिकतम अनुदान मर्यादा | अ. क्र. | घटक | अधिकतम अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | फुल पिके, मसाला पिके-हळद (रोपवाटिका) | मार्गदर्शक सूचनेनुसार | ८ | एकात्मिक पॅक हाऊस | ग्राह्य भांडवली खर्चाच्या अ. सर्वसाधारण क्षेत्र- ३५ टक्के ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र- ५० टक्के |
| २ | अळिंबी उत्पादन प्रकल्प | रु. ८.०० लाख | ९ | शीतखोली | |
| ३ | जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन | रु. ०.२० लाख/हेक्टर | १० | पूर्वशीतकरण गृह | |
| ४ | सामूहिक शेततळे | २४x२४x४ मी. रु. १.७५ लाख व ३४x३४x४.७ मी. रु. ३.३९ लाख | ११ | शीतगृह | |
| ५ | शेततळे अस्तरीकरण | जास्तीत जास्त रु. ०.७५ लाख | १२ | एकात्मिक शीतसाखळी | |
| ६ | संरक्षित शेती-हरितगृह | मॉडेलनिहाय मंजूर खर्च मापदंडानुसार किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के (जे कमी असेल ते) | १३ | रेफर व्हॅन | |
| | शेडनेट हाऊस | | १४ | रायपनिंग चेंबर | |
| | हरितगृहातील उच्च प्रतीची भाजीपाला लागवड | रु. ७० प्रती चौ.मी. | १५ | एकात्मिक पूर्वशीतकरणगृह व शीतखोली (सोलर पॉवरसह) | रु. ५.२५ लाख प्रति युनिट |
| | हरितगृहातील उच्च प्रतीची फुलपिके लागवड | रु. २१३/- ते रु. ३५०/- प्रती चौ.मी. (मार्गदर्शक सूचनेनुसार) | १६ | प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फळे, भाजीपाला, मसाला, हळद, मिरची, काजू, बेदाणा इ.) | ग्राह्य भांडवली खर्चाच्या अ. सर्वसाधारण क्षेत्र- ४० टक्के ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र- ५५ टक्के |
| | प्लास्टिक मल्चिंग | रु. ०.१६ लाख प्रती हेक्टर | १७ | कांदाचाळ उभारणी | खर्चाच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु. ८७,५००/- (२५ मे. टन) |
| ७ | ट्रॅक्टर २० अश्वशक्तीपर्यंत | रु. १.०० लाख प्रती युनिट | १८ | मधुमक्षिका पालन-बी-ब्रीडरकडून मधुमक्षिका वसाहतीचे उत्पादन करणे. | खर्चाच्या ४० टक्के कमाल रु. ४.०० लाख प्रती ब्रीडर |
| | पीक संरक्षण उपकरणे मॅन्युअल स्प्रेअर अ. नॅपसॅक/ फुट स्प्रेअर | रु. ६००/- प्रति युनिट | १९ | मधुमक्षिका वसाहत व संच वाटप | खर्चाच्या ४० टक्के कमाल रु. १६०० प्रति पेटी (वसाहतीसह) |
| | ब. पॉवर नॅपसॅक स्प्रेअर/ पॉवर ऑपरेटेड तैवान स्पेअर (क्षमता ८-१२ लिटर) | रु. ३१००/- प्रति युनिट | | | |

**वरील घटकांचा लाभ घेण्याकरिता प्रमुख अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :**

१. उपरोक्त घटकांकरिता शेतकऱ्यांनी स्वतंत्ररित्या **www.hortnet.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनेच जाहिरात प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून वीस दिवसांत नोंदणी करावी. नोंदणी करतानाच शेतकऱ्यांनी ७/१२, ८-अ चा नमुना, आधार कार्ड, आधार संलग्न राष्ट्रीयीकृत बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, विहित नमुन्यातील हमीपत्र, संवर्ग प्रमाणपत्र (अनु.जाती व अनु. जमाती शेतकऱ्यांसाठी), हॉर्टनेटच्या संकेतस्थळावर अपलोड करावेत. थेट पद्धतीने अर्ज (ऑफलाईन) कोणत्याही कार्यालयात स्वीकारले जाणार नाहीत.

२. **सामूहिक शेततळे** या घटकाचा लाभ औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, जळगाव या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातील जिल्हे, तसेच विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा या जिल्ह्यांतील सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना अनुज्ञेय राहील. राज्यातील सर्व जिल्ह्यांतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना सामूहिक शेततळ्यासाठी लाभ अनुज्ञेय राहील. वरील २० जिल्हे वगळता इतर जिल्ह्यांमधील सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना सामूहिक शेततळे या घटकासाठी लाभ अनुज्ञेय असणार नाही. त्यामुळे या लाभार्थ्यांनी या घटकासाठी अर्ज करू नयेत.

३. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना सामूहिक शेततळे मंजूर करताना त्यांच्याकडे फलोत्पादन पिके असण्याबाबतची अट शिथिल करण्यात येत आहे. तथापि, शेततळ्यास पूर्वसंमती देताना संबंधित लाभार्थ्याने भविष्यात फलोत्पादन पिके लागवड करण्यात येणार असल्याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

४. सन २०१८-१९ पासून २४x२४x४ मी व ३४x३४x४.७ मी या आकारमानानेच सामूहिक शेततळे मंजूर करण्यात येतील.

५. ज्या शेतकऱ्यांनी सन २०१७-१८ मध्ये काही बाबींसाठी अर्ज केलेले आहेत, तथापि त्यांना पूर्वसंमती मिळालेली नाही, अशा सर्व शेतकऱ्यांनी सन २०१८-१९ च्या नवीन नियम/ मार्गदर्शक सूचनाप्रमाणे पुनश्च अर्ज करणे आवश्यक आहे. जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वी केलेले सर्व अर्ज रद्द समजण्यात येतील.

६. उपरोक्त घटकांसाठी अर्जाचा विहित नमुना **www.hortnet.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून, अधिक माहितीसाठी नजिकच्या मंडळ कृषी अधिकारी/ तालुका कृषी अधिकारी तसेच संबंधित गावातील कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा.

७. लाभार्थ्याने ऑनलाईन अर्ज करताना ज्या घटकासाठी लाभ घ्यावयाचा आहे ते नमूद करावे. यासाठी ऑनलाईन Scheme Filling करावे.

८. वरील तक्त्यात दर्शविलेल्या अनुदानाच्या मर्यादेत केंद्र शासनाचे सन २०१८-१९ साठी बदल केल्यास त्यानुसार अनुदान देय राहील.

स्वाक्षरित/- व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे

**डी.जी.आय.पी.आर. २०१८/२०१९/१०९१**

Scanned by CamScanner